www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118



■ जिल्हा परिषदेत 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा

पान ३ वर....


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ अपघातग्रस्तांना शासनामार्फत सर्वोतोपरी...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २२८ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, २५ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



## पाच वर्षांत घरगुती विजेचे दर २३ टक्क्यांनी कमी होणार - विश्वास पाठक

● मुंबई, दिगंबर जाधव :

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेमुळे पुढील दोन वर्षांत कार्यरत होणा-या सौर उर्जा प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार असून घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहक यांनाही मोठा फायदा होणार आहे. सौर उर्जा प्रकल्पांमुळे आगामी पांच वर्षांत १०० युनिट पर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ प्रति युनिट पर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे दर ११.८२ रु. प्रति युनिट पर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होतील, एक एप्रिल पासून महावितरण च्या घरगुती ग्राहकांना दर कपातीचे लाभ टप्प्याटप्प्याने मिळू लागतील.

अशी माहिती महावितरण चे स्वतंत्र संचालक व भाजपा प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी शुक्रवारी दिली.

पान २ वर

# विधान परिषदेतील पाच जागांसाठी भाजपाकडून ६० जण इच्छुक ?



● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात पूर्ण बहुमताने महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर राज्यपाल नियुक्त १२ जागांपैकी सात जागांवर नियुक्त्या झाल्या असल्या तरी उर्वरित पाच जागांसाठी भाजपामध्ये मोठ्या प्रमाणावर चढाओढ चालू असून भाजपात प्रवेश केलेल्या दिगज्यांपैकी मागच्या दाराने विधान परिषदेत जाण्यासाठी तब्बल ६० जण इच्छुक असल्याची धक्कादायक माहिती प्राप्त होत आहे.

पान २ वर

### राज्य विधिमंडळातील विधान परिषदेतील संख्याबळ व सद्यस्थिती

| | |
|---|---|
| **महाविकास आघाडी** | |
| ■ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष | ७ |
| ■ राष्ट्रीय काँग्रेस व एक अपक्षांची साथ | ८ |
| ■ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष | ५ |
| एकूण | २० |
| **महायुती पक्षीय बलाबल** | |
| ■ भाजपा | २३ |
| ■ शिवसेना शिंदे गट | ०७ |
| ■ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट | ०६ |
| ■ अपक्ष | ०२ |
| एकूण | ३८ |

## माथेरान घाटात डस्टर गाडी जळून खाक

● माथेरान, फरीद डावरे :



नेरळ माथेरान घाटामध्ये डस्टर गाडीने पेट घेतल्याने नेरळ माथेरान गाठ सकाळी दोन ते तीन तास बंद राहिला. शुक्रवार शनिवार रविवार हा माथेरानचा सीझनचा दिवस असल्याने सकाळच्या वेळेसच चांगभले तिसऱ्या टन ला वाशी मुबई मुंबई येथून येणारे पर्यटक आपली MH ४३AN९४६८ डस्टर गाडीने माथेरानला येत असताना अचानक घाटामध्ये गाडीने पेट घेतल्याने घाटामध्ये दोन्ही बाजूची वाहतूक खोळंबी गाडीचे मालक यांना ती गाडीमध्ये आग लागण्याची लक्षात येताच त्यांनी गाडीमधून बाहेर आले त्यामुळे मोठी दुर्घटना तळली अन्यथा घाटामध्ये अशी काही गोष्ट घडली तर अत्यावश्यक सेवा येण्यास फार विलंब लागतो परंतु प्रसंग सावध राहून गाडीमध्ये सर्व बाहेर पडले आणि क्षणार्धात गाडीला आगीने एक रुद्र रूप धारण केले आणि गाडी पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. ज्या ठिकाणी घटना घडली त्या ठिकाणी मोबाईल रेंज कमी असल्याने माथेरान फायर ब्रिगेड गाडी येईपर्यंत खुप उशिरा झाला होता , तो पर्यंत गाडीचा फक्त सांगाडा धुमसत होता.

# कल्याण परिमंडळ ३ अंतर्गत ५ बांगलादेशी नागरीकांवर कारवाई

### कल्याण मधील मानपाडा व महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन पोलीसांची कारवाई




● कल्याण, विवेक गुंजाळ :

पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या आदेशाने बांगलादेशी नागरीकांवर कारवाईची मोहिम परिमंडळ ३ कल्याण हद्दीत सुरु असुन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण मधील मानपाडा व महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन पोलीसांनी कारवाई करत ५ बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. मानपाडा पोलीस स्टेशन हद्दीत टाटानाका, देशमुख होम्स् जवळ, गांधीनगर झोपडपटटी, कल्याण पुर्व आणि महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन हद्दीत कल्याण पश्चिम रेल्वे परिसर या ठिकाणी बांगलादेशी नागरीक कोणत्याही कागदपत्राशिवाय व भारत सरकारने विहीत केलेल्या मार्गाव्यतिरीक्त घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करुन बेकायदा वास्तव्यास असल्याबाबतची गोपनीय माहिती मिळाल्याने मानपाडा व महात्मा फुले चौक पोलीसांनी स्वतंत्र पथके तयार करुन दोन्ही ठिकाणी धाडी टाकुन पडताळणी केली असता एकुण ५ बांगलादेशी नागरिक विनापरवाना भारतात राहत असल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांची चौकशी करुन त्यांचेपैकी ४ बांगलादेशी नागरीकांवर मानपाडा पो.स्टे. आणि १ बांगलादेशी महिला नागरीकांवर महात्मा फुले चौक पो.स्टे. मध्ये गुन्हे दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## एसटीची भाडेवाढ मध्यरात्रीपासून लागू

● मुंबई, राकेश गायकवाड :

राज्याच्या ग्रामीण भागाची जीवनवाहीनी म्हटली जाणाऱ्या एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत एसटीच्या भाडे वाढीला मंजूरी देण्यात आली आहे. येत्या २५ जानेवारीपासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर मोठा भार येणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाची २७६ वी बैठक परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव , राज्य परिवहन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली. या बैठकील राज्य परिवहन प्राधिकरणाचे सदस्य अतिरिक्त पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि परिवहन आयुक्त देखील उपस्थित होते. या बैठकीत एसटीला १४.९५ टक्के भाडे वाढ करण्यास मंजूरी मिळाली आहे. डिझेल, चेसीस, टायर या घटकांच्या किंमती वाढल्यामुळे तसेच महागाई भत्यात वाढ झाल्यामुळे आपोआप भाडेवाढ सुत्रानुसार उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या प्रवासी भाडेदरात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

पान २ वर



## २० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त, पेण नगरपालिकेची धडक कारवाई

### ■ १७ हजार ९०० रुपयांची दंड वसुली

● रायगड, धनश्री सट्टा :

सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी असताना बेधडक प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात आहे. प्लास्टिकमुक्त अभियान राबवूनही त्याला पेणमध्ये दाद दिली जात नाही. त्यामुळे शहरातील दुकानांसह हातगाड्यांवर प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढत असून या प्लास्टिक पिशव्यांवर तात्काळ बंदी आणावी, अशी मागणी निसर्ग मित्रकडून केली जात होती. या पार्श्वभूमित्वर पेण नगरपरिषदेने मोहीम राबवून तब्बल ९० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या असून याबद्दल १६ हजारांचा दंड वसूल केला आहे.

सरकारने सर्व महापालिका, नगरपालिका तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांना प्लास्टिकमुक्त अभियान राबवण्याचे



आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे कारवाई केली जात असली तरी पेणमधील प्लास्टिक मुक्त अभियानाला रहिवाशांसहा व्यापारी केराची टोपली दाखवत होते. हातगाडी, दुकानदार, भाजी व्यापारी आजही प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर करत आहेत. शहरातील गटारे प्लास्टिकच्या पिशव्यांनी तुडुंब भरत असून शहराच्या अनेक कचरा डेपोजवळ प्लास्टिक पिशव्या मोठ्या प्रमाणात टाकण्यात येत आहेत.

पान २ वर



## महापालिकेच्या घंटागाडीने वृद्धाला फरफटत नेले, अपघातात वृद्धाचा मृत्यू

● ठाणे, रोहित जैसवार :

दिवा येथील संतोष नगर भागात ठाणे महापालिकेच्या घंटागाडीने ७४ वर्षीय व्यक्तीला फरफटत नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सिताराम थोटम असे मृताचे नाव असून या प्रकरणाची नोंद मुंब्रा पोलीस ठाण्यात केली जात आहे.

पान २ वर

# भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ महाराष्ट्रात

### कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबरसुरक्षेच्या भविष्याचा आराखडा तयार करण्यासाठी टास्कफोर्स स्थापन - माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई, विशाल कारंडे :

''विकसित भारत २०४७'' मिशनच्या यशस्वी पूर्ततेसाठी आणि भारताच्या $५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचालीसाठी शिक्षण आणि तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्यामुळे महाराष्ट्र हे भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करणारे राज्य असेल असे माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.




जागतिक शिक्षण दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी म्हटले आहे.

पान २ वर

## नैना क्षेत्रातील १०६२ शेतकऱ्यांच्या हरकतींवर लवादाकडून सुनावणी

● नवी मुंबई, भावना जैन :

नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्पाविरोधात शेतकऱ्यांमध्ये संभ्रम असताना नैना प्रकल्पाची नगर रचना परियोजना क्रमांक १२ च्या योजनेवर हरकत घेतलेल्या १०६४ शेतकऱ्यांच्या सुनावणीचे वेळापत्रक सिडकोने गुरुवारी जाहीर केले. २७ जानेवारी ते २४ मार्चपर्यंत ही सुनावणी लवादामार्फत घेतली जाणार आहे. नैना प्रकल्पाचे कोणतेही काम थांबणार नाही, अशीच भूमिका या सुनावणीच्या वेळापत्रकातून सिडकोने जाहीर केली आहे.

नैना परियोजना क्रमांक १२ साठी एस. व्ही. सुर्वे या लवादांची नियुक्ती केली आहे. ही योजना जाहीर केल्यानंतर हजारो शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या. भारतीय शेतकरी कामगार पक्ष आणि गावठाण विस्तार हक्क समिती यांच्या




पदाधिकाऱ्यांनी नैना प्रकल्प होत असलेल्या गावागावांमध्ये बैठका घेऊन नैना प्रकल्पाविरोधात लढा उभारला. शेतकऱ्यांना त्यांचा भूखंड स्वरुपात मोबदला देण्यापूर्वीच नैना प्रकल्पामध्ये सिडको मंडळाने साडेसहा हजार कोटी रुपयांची विकासकामे विविध कंपन्यांना वाटप केले आहे. रस्ते, पावसाळी नाले, मलनिस्सारण वाहिनी भूमिगत करणे अशी विविध कामे शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय सिडकोने जाहीर केल्याने शेतकरी संतापले आहेत.

पान २ वर

## भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईसाठी नाशिकच्या तरुणाचे मंत्रालयाबाहेरील झाडावर अनोखे आंदोलन



● मुंबई, सचिन कदम :

नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतीत झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी सर्वपातळ्यांवर तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने संतप्त झालेल्या सुनील तुकाराम सोनवणे या तरुणाने आज थेट मंत्रालयाच्या बाहेरील झाडावर चढून आज अनोखे आंदोलन केले . अखेर पोलिसांनी या तरुणाला शांत करून झाडावरून खाली उतरवले आणि ताब्यात घेतले. नाशिक जिल्हापरिषदेतील गिरणा नगर गावातील ग्रामपंचायतीने सर्वच शासकीय योजनांमध्ये भ्रष्टाचार केल्याचा आरोप या तरुणाने केला यासंदर्भात पंचायत समिती ते जिल्हापरिषदेपर्यंत संबंधितांना निलंबित करण्याच्या मागणीसाठी स्थानिक पातळीवर तक्रारी केल्या पण त्याला पाठिशी घालण्यात येत असल्यामुळे सुनील सोनावणे याने आज मंत्रालय गाठले मंत्रालयात सध्या प्रवेशावर निर्बंध आणले आहेत. मंत्रालयात प्रवेश मिळणे कठीण झाल्यामुळे आज दुपारच्या सुमारास नाशिकच्या गिरणानगर गावातील सुनील तुकाराम सोनवणे या तरुणाने मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील झाडावर चढला आणि आपल्या मागण्यांचा बॅनर फडकावला.

पान २ वर

# वक्फ बोर्डाच्या संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत मोठा राडा

### अरविंद सावंत, असदुद्दीन ओवेसींसह १० खासदार निलंबित

● मुंबई, विशाल पाटील :

वादग्रस्त वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला आहे. या अहवालावर शुक्रवार आणि शनिवारी अशी दोन दिवस बैठक होऊन चर्चा होणार होती. मात्र आज आज बैठकीच्या पहिल्या दिवशीच खासदारांमध्ये गदारोळ झाला. ज्यामुळे आता विरोधी पक्षाच्या



१० खासदारांना समितीमधून निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे अरविंद सावंत, असुद्दीन ओवेसी यांचा समावेश आहे. या बैठकीत अहवालावर चर्चा होऊन ते विधि मंत्रालयाकडे दिले जाणार होते. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. भाजपाचे खासदार जगदंबिका पाल हे या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष आहेत. ते म्हणाले की, आज आम्ही जम्मू-काश्मीरमधील शिष्टमंडळ मीरवाईज उमर फारूक यांच्या शिष्टमंडळाला त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळ दिला होता. मात्र संसदेत विधेयकाच्या चर्चेत सहभागी न होणारे असदुद्दीन ओवेसी आज मात्र चर्चेत सहभागी झाले. तसेच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी माझ्याशी असभ्य वर्तन करत असंसदीय भाषा वापरली. मी त्यांना शांत करण्याचे आवाहन करत होतो. पण ते ऐकायला तयार नव्हते. अखेर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी खासदारांचे निलंबन करण्याचा प्रस्ताव दिला.

पान २ वर

## संपादकीय

# राष्ट्र वाचवायचंय, तर घुसखोरी थांबवणे आवश्यक

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथ घेतल्यानंतर त्वरित अवैध घुसखोरीविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले. ट्रम्प यांनी जन्मसिद्ध नागरिकत्वाचा कायदाही रद्द केला आहे, ज्यामुळे अमेरिकेची धोरणे घुसखोरांवर कडक होण्याची दिशा घेत आहेत. आता भारतातही बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांच्या समस्येवर ठोस कारवाई करणे अत्यावश्यक ठरले आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दोघेही 'राष्ट्र प्रथम' या तत्वावर आधारित धोरणे राबवत आहेत. ट्रम्प यांच्या विजयाची आणि मोदींविरोधी अपप्रचाराला मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने दाखवले की, राष्ट्रीय स्वाभिमान आणि लोकहिताला प्राधान्य दिले जात आहे. त्याचप्रमाणे, डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाने अमेरिकेतही एक नवा वळण घेतला आहे. त्यांच्या निर्णयांमुळे अमेरिकेत घुसखोरीविरोधी वातावरण तयार झाले आहे.ट्रम्प यांनी शपथ घेतल्यानंतर लगेचच अनेक कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केली, ज्यात पॅरिस हवामान करारातून अमेरिका बाहेर पडण्याचा निर्णय आणि अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना जन्मसिद्ध नागरिकत्व न देण्याचा निर्णय समाविष्ट होता. अमेरिकेच्या राज्यघटनेच्या चौदाव्या घटनादुरुस्तीचे उल्लंघन करत ट्रम्प यांनी अवैध घुसखोरांच्या मुलांना नागरिकत्व न देण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या संदर्भातील धोरणात मोठे बदल होणार आहेत. अमेरिकेतील काही राज्यांचे ॲटर्नी जनरल ट्रम्प यांच्या या निर्णयाविरोधात न्यायालयात गेले आहेत, तरीही ट्रम्प यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्षाच्या अधिकारात असलेल्या निर्णयाची संविधानीकता योग्य आहे. तसेच, त्यांनी अमेरिकेतील अवैध घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्याचा संकेत दिला आहे. यासाठी, सीमा सुरक्षा कडक करण्यासाठी लष्कर पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. युरोपमध्ये घुसखोरांच्या समस्येचा परिणाम पाहता, अमेरिकेतील परिस्थिती देखील त्याच दिशेने जात आहे. अमेरिकी कायद्यातील बंधनांमुळे बेकायदेशीर घुसखोरांना नागरिकत्व मिळवणे सुलभ होत होते. ट्रम्प यांनी यामध्ये मोठे बदल केले आहेत. अमेरिकेतील डेमोक्रॅटिक पक्षाने विरोध केला, पण ट्रम्प यांनी त्यांच्या धोरणांसाठी ठाम भूमिका घेतली. भारताच्या संदर्भात विचार केल्यास, भारतात देखील बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांची संख्या वाढत आहे. या घुसखोरांनी आपले बस्तान भारतात बसवले आहे आणि अनेक वेळा ते बनावट कागदपत्रांचा वापर करून देशात प्रवेश करतात. अकोला येथील घोटाळ्याने ही समस्या आणखी उघडकीस आणली आहे, ज्यात घुसखोरांना जन्म दाखला मिळवून दिला जात होता. अशा प्रकारच्या घोटाळ्यांमुळे देशाच्या सुरक्षा यंत्रणा आणि सामाजिक संरचना संकटात येत आहेत. भारत सरकारने या घुसखोरांविरोधात त्वरित ठोस कारवाई सुरू केली आहे. महाराष्ट्रात बांगलादेश आणि म्यानमारमधून मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत आहे, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने संबंधित यंत्रणांना निर्देश दिले आहेत. दहशतवादी कारवायांमध्ये घुसखोरांचा सहभागदेखील समोर आला आहे. घुसखोरीमुळे देशात गंभीर सामाजिक, सुरक्षा आणि आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. **- अनिकेत घनश्याम भंकाळ**

## अन्न व पोषण सुरक्षा व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत २८ जानेवारी पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन


**मुंबई (राकेश गायकवाड) :** अन्न आणि पोषण सुरक्षा-कडधान्य, भात व गहू तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-गळीतधान्य अंतर्गत महाडीबीटीवर सिंचन साधने (पाईप व पंप) या घटकांचे लक्षांक भरण्यात आले आहेत. तरी, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in (farmer login) या संकेतस्थळावर २८ जानेवारी, २०२५ पर्यंत अर्ज करावेत असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. तसेच कडधान्यामध्ये बीज प्रक्रिया ड्रम (seed treatment drum), पौष्टिक तृणधान्य अंतर्गत (pulveriser) व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-गळीतधान्य अंतर्गत मनुष्यचलित टोकन यंत्र (Dibbler), मनुष्यचलित सायकलवर चालणारे सिड ड्रील (Seed drill), छोटे तेल घाणा सयंत्र (oil extraction unit ) या घटकांचे लक्षांक भरण्यात आले आहेत. बाबींसाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या अर्जातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे.

## आजची चित्रोळी



गळ्यांत घालून गळें आणखी
खांद्यावरती हात !
मैत्री जगती घट्टच रुजतें
सर्वांना हे ज्ञात !!

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**



# राष्ट्रीय मतदार दिन

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

**श्याम बसप्पा ठाणेदार,पुणे**

## साताऱ्यात पालकमंत्री समर्थकांचा धुडगूस व बघ्याची भूमिका?

**सातारा (दिगंबर जाधव)** - सातारा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था कायम राहावी. यासाठी प्रामाणिकपणाने प्रयत्न करणारे सातारा जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई यांची सातारा जिल्हा पालकमंत्री पदी निवड झाल्यानंतर साताऱ्यात प्रथमच आगमन झाले. या आगमनाच्या स्वागतासाठी त्यांच्या कथित समर्थकांनी सातारा शहरातील शिवतीर्थावर धुडगूस घातला. यावेळी काहींच्या बघेवादी भूमिकेने यंत्रणा हतबल झाल्याचे दिसून आले. सातारा शहरातील या स्वागत नाट्याने अनेकांनी शांत बसण्याचा धन्यता मानली. याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्ह्याच्या हद्दीतील शिरवळ येथून महायुतीतील शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे पर्यटन, खाण व माजी सैनिक कल्याण कल्याण विभागाचे कॅबिनेट मंत्री नामदार शंभूराज देसाई यांच्या स्वागताचे नियोजन करण्यात आले होते. परंतु, तीन तास उशीर झाल्यामुळे जागोजागी स्वागत स्वीकारून नामदार देसाई हे सायंकाळी सातारा येथील शिवतीर्थावर आले. यावेळी त्यांच्या कथित समर्थकांनी कर्कर्ष आवाजात डी.जे. व रस्त्यावर तुफान गर्दी केल्यामुळे लहान मुलं अक्षरशा भयभीत झाली होती. तर काही वाहन चालकांना आपापली वाहने कुठे घेऊन जावे ? हेच कळत नव्हते. गोंधळामुळे व कर्कश आवाजाच्या डीजे मुळे कायदा व सुव्यवस्था अंग चोरून गपचूप बसल्याचे दिसून आले. अनेकांची छाती धडधडत होत होती .पण याचं कुणालाच सोयर सुतक नव्हते.

शिवतीर्था वर नेहमीच अनेकांचे अनेकांचे सत्कार व स्वागत केले जाते .पण ,शुक्रवार दिनांक २४ जानेवारी राष्ट्रीय बालिका दिन साजरा होत असतानाच शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वाहनातून बाहेर डोकावून बालिका आनंद उत्सव साजरा करत होते.

## पान १ वरून...

### पाच वर्षांत घरगुती विजेचे दर २३ टक्क्यांनी...

विजेचा १०० युनिट पर्यंत वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ पर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचा दर ११.८२ रु. पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव महावितरण ने राज्य वीज नियामक आयोगापुढे ठेवला आहे असे सांगतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सौर ऊर्जा निर्मितीच्या धडाकेबाज कार्यक्रमामुळेच शेतकरी , घरगुती व औद्योगिक ग्राहकांचा फायदा होणार असल्याचे पाठक म्हणाले मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०योजनेमुळे राज्यात आगामी दोन वर्षांत १६ हजार मेगावॅट एवढी सौर वीज निर्मिती होणार आहे. त्याचा मोठा फायदा महावितरण ला होणार आहे. महावितरण चा सरासरी वीज पुरवठ्याचा दर कमी होणार असल्यामुळे १०० युनिट वापर असणाऱ्या ग्राहकांचे वीज दर ७ रु. ६५ पैशा पासून (प्रती युनिट) ५ रु. ८७ पैसे पर्यंत म्हणजेच २३ टक्क्यांनी कमी होतील तर १०१ ते ३०० युनिट वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांचे दर सरासरी १३.४९ रु. प्रति युनिट रु.११.८२ पर्यंत म्हणजेच १२ टक्क्यांनी कमी होतील, अशी आशाही श्री. पाठक यांनी व्यक्त केली . औद्योगिक ग्राहकांसाठीच्या सर्व सवलत, प्रोत्साहन योजना चालू ठेवण्यात येतील तसेच औद्योगिक ग्राहकांना क्रॉस सबसिडी देण्याची गरज पडणार नसल्याची माहितीही श्री. पाठक यांनी दिली. पाठक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे अनेक फायदे पुढील पाच वर्षांत ग्राहक आणि महावितरण ला होणार आहेत. महावितरणचा सरासरी वीज पुरवठ्याचा दर सध्याच्या ९ रु. ४५ पैसे या दरावरून २०२९ - ३० पर्यंत ९ रु. १४ पर्यंत खाली येणार आहे.

### विधान परिषदेतील पाच जागांसाठी!...

राज्यात दोन महिन्यापूर्वी विधानसभेच्या निवडणुका होऊन पूर्ण बहुमताने भाजपा सरकार सत्तेत सामील झाले यामध्ये शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट यांनी देखील सत्तेत सामील होण्याचा निर्णय घेतला त्यानंतर महिन्याभरातच राज्यपाल नियुक्त १२ जागांपैकी सात जागांवर भाजपा शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट यांच्या आमदारांची वर्णी लागली

राज्यात पूर्ण बहुमताने भाजपा सरकार सत्तेत असताना देखील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तसेच राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष या तिन्ही पक्षातून भाजपामध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग चालू असून हे इनकमिंग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी असल्याचे बोलले जात आहे त्यातच भाजपामध्ये प्रवेश करणाऱ्या दिग्गज पदाधिकाऱ्यांना मागील दाराने विधान परिषदेत जाण्याचे वेध लागले आहेत

राज्य विधिमंडळाच्या विधान परिषदेची एकूण सदस्य संख्या ७८असून एकूण रिक्त जागा २० असून त्यातील १५ जागा या स्थानिक प्राधिकरणांमधून निवडून द्यायचे आहेत मात्र मागील पाच वर्षापासून ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुका न झाल्यामुळे मागील अडीच वर्षापासून स्थानिक प्राधिकरणांमधून रिक्त झालेल्या जागा भरल्या गेलेल्या नाहीत

तर पाच जागा राज्यपाल नियुक्त भाजपाच्या कोट्यातल्या शिल्लक आहेत राज्य विधिमंडळाच्या विधान परिषद सभागृहात ७८ सदस्यांचे सभागृह असून त्यापैकी वीस जागा रिक्त असून 58 सदस्य सभागृहात आहेत त्यापैकी एक विधान परिषद सभापती, एक विधान परिषद उपसभापती ,व एक विरोधी पक्ष नेता

राज्यात भाजपा बहुमताने सरकार मध्ये असतानाही देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रभुत्व गाजवण्यासाठी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून यायच्या १५ जागांसाठी देखील भाजपाने आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली असल्याने त्याचाच एक भाग म्हणून भाजपात मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरू आहे मात्र पक्षात येणाऱ्या व मागच्या दाराने विधान परिषदेत जाणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या ६० झाली असून राज्यपाल नियुक्त केवळ भाजपाच्या कोट्यामध्ये पाच जागा असल्याने यामध्ये कोणाची वर्णी लागणार व कोणाला महामंडळावर समाधान मानावे लागणार हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे

### एसटीची भाडेवाढ मध्यरात्रीपासून लागू

या प्रस्तावास राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २७६ व्या बैठकीत मंजूरी मिळाली आहे. हकिम समितीने निश्चित केलेल्या सुत्रानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला टप्पा वाहतूक सेवांच्या भाडेदरामध्ये १४.९५ टक्के वाढ करण्यास मान्यता मिळाली आहे. ही भाडेवाढ दि २५ जानेवारी २०२५ (दिनांक २४.०१.२०२५ च्या मध्यरात्रीनंतर) पासून लागू करण्याचे आदेश प्राधिकरणाने दिले आहेत.

### २० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त पेण...

अखेर धडक कारवाई करत नगरपरिषदेने हातगाड्यांवरील प्लास्टिकच्या पिशव्या जप्त करून दंडात्मक कारवाई केली आहे.

पेण नगरपरिषदेने जवळपास १२० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या आहेत आणि १६ हजारांचा दंड ठोठावला आहे. यापुढे दुकानदारांसह रहिवाशांनी प्लास्टिक पिशव्या बंद कराव्यात अन्यथा कारवाई केली जाईल अशी माहिती नगरपरिषदेचे आरोग्य अधिकारी दयानंद गावंड यांनी दिली. पेणमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढल्याने अस्वच्छता वाढून गटारे तुंबत आहेत. आता नगरपालिकेने दंडात्मक कारवाई करून प्लॅस्टिक पिशव्या जप्त केल्या असल्या तरी अशीच कारवाई नियमित करायला हवी असे यावेळीनिसर्गमित्र उदय मानकवळे यांनी संगितले.

### महापालिकेच्या घंटागाडीने वृद्धाला फरफटत...

ही घंटागाडी चालक पाठिमागे (रिव्हर्स) चालवित नेत होता. त्यामुळे हा अपघात झाल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणात स्पष्ट झाले आहे. संतोष नगर येथील चाळ क्रमांक दोन परिसरात सिताराम थोटम हे वास्तव्यास आहेत. शुक्रवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास त्यांच्या परिसरातील कचरा वाहून नेण्यासाठी ठाणे महापालिकेची घंटागाडी आली होती. ही घंटागाडी संबंधित चालक पाठिमागे नेत होता. त्याचवेळी थोटम हे त्या गाडीच्या मागे होते. त्यांना घंटागाडी मागे येत असल्याचे दिसले नाही. त्यामुळे ते घंटागाडी खाली आले. या अपघातात ते गाडीसोबत काही मीटर अंतरापर्यंत फरफटत गेल्याने त्यांना गंभीर जखम झाली. त्यांना उपचारासाठी कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणाची नोंद मुंब्रा पोलीस ठाण्यात केली जात आहे.

### भारतातील पहिले कृत्रिम...

कृत्रिम बुध्दीमत्ता विद्यापीठ स्थापन करण्याचा राज्य सरकारचा निर्णय ऐतिहासिक ठरणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखालील हा प्रकल्प राबवला जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने प्रेरित उद्योग आणि तंत्रज्ञान क्रांतीसाठी विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणारे हे विद्यापीठ असेल. हे विद्यापीठ अत्याधुनिक संशोधन आणि कौशल्य विकासासाठी केंद्रस्थानी राहील. तसेच हे विद्यापीठ भारतीय तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जागतिक अर्थव्यवस्थेत नेतृत्व करण्यासाठी तयार करेल," असेही ॲड. शेलार यांनी सांगितले.

सरकार लवकरच देशातील पहिले राज्य-स्तरीय कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर धोरण जाहीर करणार असून यासाठी एक विशेष टास्कफोर्स स्थापन करण्यात आले आहे. माहिती व तंत्रज्ञान मंत्री यांच्याच नेतृत्वाखाली या धोरणाचा आराखडा तयार होईल. तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर असेल. आमचे सरकार विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि नवसंकल्पनांच्या संधी निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षणात परिवर्तन घडवून, भविष्यकालीन कुशल मनुष्यबळ घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी म्हटले आहे.

### नैना क्षेत्रातील १०६२ शेतकऱ्यांच्या हरकतींवर...

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील बाधितांना २२.५ टक्के विकसित भूखंड आणि आर्थिक मोबदला मिळाल्याने नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांना विमानतळ बाधितांप्रमाणे पॅकेजची मागणी होत आहे. राज्य सरकारला आणि सिडको मंडळाला कोणतेही संपादन न करता नैना प्रकल्प ४० गावांमधील शेतजमिनींवर राबवायचा असल्याने शेतकरी संतापले आहेत. गुरुवारी नैना परियोजना क्रमांक १२ मध्ये वाकडी, उमरोली, चिंचवली तर्फे वाजे, उसर्ली (बुर्दुक), रिटघर, ओवळे, मोरबे, कोंडले, महाळुंगी या गावांचा समावेश आहे. भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांनी सिडको मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना भेटून नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर काम करण्यापूर्वी शेतकऱ्यांना या प्रकल्पातून किती भूखंड मिळणार तो कुठे मिळणार याची शाश्वती पटवून द्या, नंतरच नैना प्रकल्पाची विकासकामे सुरू करण्याचे सांगीतले होते. मात्र सिडकोने त्यांची कायदेशीर प्रक्रिया सुरूच ठेवली आहे. सिडको मंडळाने जाहीर केलेल्या धोरणानुसार शेतकऱ्यांच्या जमिनीपैकी ४० टक्के विकसित भूखंड शेतकऱ्यांना मिळेल आणि उर्वरित ६० टक्के भूखंडाचा वापर सिडको विकासासाठी करेल. मात्र शेतकऱ्यांचा याच धोरणाला विरोध असून ५० टक्के तरी विकसित भूखंड शेतकऱ्यांना मिळावा अशीही अनेक शेतकऱ्यांची मागणी आहे. प्रत्येक गावाच्या गुरचरण जमिनी आणि शासकीय जागा हा गावाच्या वापरासाठी आणि विकासासाठी गावाकडेच्या रहाव्यात. नैना प्राधिकरणाने त्या जमिनींचा नगर रचनेत वापर करू नये ही भाजपची भूमिका आहे.

-प्रशांत ठाकूर, आमदार, भाजप

### भ्रष्ट्राचा-यांवर कारवाईसाठी नाशिकच्या...

अचानक झालेल्या या प्रकारामुळे पोलिसांची एकच धावपळ उडाली. पोलिसांनी झाडाला चारही बाजून तुकाराम घेरले. अग्निशमन दलाचे वाहन बोलविण्यात आले काही मिनिटातच बघ्यांची गर्दी वाढली. पोलिसांचा फौजफाटा बघताच सुनील सोनावणे झाडाच्या वरच्या फांदीवर चढला. अग्निशमन दलाचे जवान येताच त्यांनी झाडाच्या खाली जाळया धरल्या. 'तू खाली ये आम्ही तुझ्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचवू', अशी विनंती पोलिस करीत होते. पण पोलिसांच्या आश्वासनावर त्याचा विश्वास बसत नव्हता. अखेर सुनील झाडावरून खाली उतरला. त्याच्या हातातील निवेदन आणि बॅनर पोलिसांनी ताब्यात घेतले आणि त्याला मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात नेण्यात आले.

### वक्फ बोर्डाच्या संयुक्त संसदीय समितीच्या...

निलंबित करणाऱ्यात आलेल्या खासदारांमध्ये कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवेसी, नसीर हुसेन, मोहिबुल्ला, मोहम्मद अब्दुल्ला, अरविंद सावंत, नदीम-उल हक आणि इम्रान मसूद यांचा समावेश आहे. बैठकीची सुरुवात गोंधळाने झाली. विरोधी पक्षातील खासदारांनी आरोप केला की, त्यांना विधेयकात जे बदल सुचविले आहेत, त्या नव्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ दिलेला नाही. कॉंग्रेसचे खासदार इम्रान मसूद यांचे संसदीय समितीमधून निलंबन झाल्यानंतर त्यांनी म्हटले की, सरकारला वक्फच्या मालमत्तांवर नियंत्रण हवे आहे. लोकसभेत सादर झालेल्या वक्फ विधेयकामध्ये ४४ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. या प्रत्येक दुरुस्तीवर 'जेपीसी'च्या दोन दिवसांच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करणे अपेक्षित होते. राज्या-राज्यांतील वक्फ मंडळांकडे १९५०मध्ये ३५ हजार जमिनी होत्या, गेल्या ७५ वर्षांमध्ये त्यांची संख्या वाढून तब्बल १० लाख झाली आहे. त्यातील अनेक जमिनी वक्फ मंडळाने बळकावल्याचा दावा 'जेपीसी'तील सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी केला आहे. या जमिनींच्या मालकीहक्काबाबत पूर्वलक्ष्यी प्रभावाने फेरआढावा घेतला पाहिजे, अशी मागणी 'जेपीसी'मध्ये करण्यात आली. 'जेपीसी'च्या आतापर्यंत झालेल्या ३४ बैठकांपैकी बहुतांश वादळी ठरल्या होत्या. तृणमूल कॉंग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांची बाटली फोडण्यापर्यंत मजल गेली होती. कॉंग्रेस, द्रमुक, शिवसेना-ठाकरे गट आदी विरोधी सदस्यांनी विधेयकातील दुरुस्त्यांना कडाडून विरोध केला होता. त्याची पुनरावृत्ती आजच्या बैठकीतही पाहायला मिळाली.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# जिल्हा परिषदेत 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा





**ठाणे (रोहित जैसवार)** - जानेवारी २०२५ रोजी १५ वा 'राष्ट्रीय मतदार दिवस' राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा असल्याने त्यानुषंगाने आज, दि. २४ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या प्रांगणात सामुहिक मतदान शपथ घेण्यात आली.

या १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी "Nothing like voting. I Vote for sure" हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला असून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मतदानाचा हक्क बजावावा व मतदानाबाबत जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी - कर्मचारी आदी उपस्थित होते.

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु." ही सामुहिक शपथ यावेळी घेण्यात आली.

# उचाट येथे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन संपन्न !

**वासिंद (विशाल पाटील)** - साहित्य कला विचार मंच आणि उचाट शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन उचाट येथील अस्पी विद्यालयात पार पडले. यावेळी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक व दोन वेळा राष्ट्रपती पुरस्कार सन्मानित डॉ.श्रीकांत पाटील, संमेलनाच्या स्वागताध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक ज्योतीताई ठाकरे तसेच ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे, कवी अशोक पाटील, सुप्रसिद्ध कवी सायमन मार्टिन, सुप्रसिद्ध कवी शारदासुत सुनील म्हसकर, उचाट शिक्षण संस्थेचे पदाधिकारी प्रभाकर मोरे, प्रभाकर श्रीपतराव, अरविंद भोईर, डॉ. किशोर डोहळे, माणिक पाटील, नरेश जोगमार्गे, बी. के पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या संमेलनात उचाट शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष शिक्षण महर्षी दिवंगत यशवंत गोपाळराव मोरे स्मृती काव्यसंमेलनाची दोन सत्र घेण्यात आली. प्रथम सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन यांनी तर दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान शहापूर येथील सुप्रसिद्ध कवी शारदासुत सुनील म्हसकर यांनी भूषविले. चारुशीला बहारे, महेंद्र पाटील, संजय



गगे, संदीप पवार, वैशाली चौधरी, प्रियांका मोरे, अमृता संखे , प्रा.ललित पाटील, निलेश गोतारणे, तुषार ठाकरे, लक्ष्मण पाटील, किशोरी पाटील, सुनीता महाजन, सुभाष नाईक, अमृता संखे, संदीप पाटील, जयेश मोरे आदी सुमारे चाळीस नामांकित कवींनी आपल्या सुंदर काव्यरचना सादर केल्या. यावेळी शारदासुत सुनील म्हसकर यांनी 'विठ्ठल, विठ्ठल अंतरंगी रंगे श्रीहरी चिंतन' ही भक्तिपर काव्यरचना आपल्या सुमधुर आवाजात गायन करून उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. तर निवडक कवींना सन्मानचिन्ह आणि सन्मान पत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. साहित्य संमेलनाचे आयोजक विजय जोगमार्गे यांनी प्रास्ताविकातून साहित्य विचार मनामनात बिंबवण्यासाठी अशी संमेलने गावोगावी आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.





# ग.वि. खाडे विद्यालयात निरोप समारंभ संपन्न !

**वासिंद (सम्यक कासारे)**- शहापूर तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित, ग.वि. खाडे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी दोन वर्षांच्या कालावधीत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच व्यक्तिमत्व विकासात कशी भर पडत गेली व दोन वर्षातील ज्ञान शिदोरी आमच्या पुढील भावी शैक्षणिक कारकिर्दीसाठी व जीवन जगताना कशी उपयुक्त होईल यासंबंधीच्या आशयाची मनोगते अनेक विद्यार्थी - विद्यार्थिनींनी व्यक्त केली. या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर तळपाडे, उपप्राचार्य प्रा. रवींद्र खरात, प्रा.नितीन बिरारी, प्रा.मनीषा पाटील, प्रा.माधुरी जागरे, प्रा. दिगंबर खरात आदींनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

# प्रजासत्ताकदिनी डोंबिवलीत अठरा हजार चौरस फुटांच्या लोकमान्य गुरुकुल क्रिडा संकुलाचे उद्घाटन

## फुटबॉल, क्रिकेट, टेनिस, बास्केटबॉल आणि पिकलबॉल खेळाडूंसाठी सुवर्णसंधी

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण)** - डोंबिवली शहरातील युवकांची आणि सर्वसामान्य डोंबिवलीकरांची गरज लक्षात घेऊन टिळक नगर शिक्षण प्रसारक मंडळ एक नवीन उपक्रम सुरू करत आहे. एमआयडीसी निवासी विभागातील लोकमान्य गुरुकुल च्या भव्य मैदानावर लोकमान्य गुरुकुल क्रीडा संकुल सुरू करण्यात येत आहे. विद्यार्थी, युवक तसेच सर्वसामान्य डोंबिवलीकरांमध्ये क्रीडाविषयक जागृती व्हावी यासाठी या क्रीडा संकुलामध्ये फुटबॉल, टेनिस, क्रिकेट, पिकल बॉल आणि बास्केटबॉल आदी खेळांसाठी उत्तम सुविधा विकसित करण्यात आली आहे, हे क्रीडा संकुल डोंबिवली परिसरातील सर्वात मोठ्या अशा अठरा हजार चौरस फुटाच्या टर्फ ने युक्त आहे; क्रिकेट साठी तीन पीचेस तर पिकल बॉल साठी दोन क्रीडांगणे उपलब्ध आहेत. बास्केटबॉल साठी देखील मोठ्या आकाराचे क्रीडांगण उपलब्ध आहे. गेल्या काही वर्षात टर्फच्या खेळपट्ट्या किंवा मैदान उपलब्ध करून देण्याची पद्धत डोंबिवली परिसरात आहे. परंतु या टर्फ चा उपयोग हा मुख्यत्वे करून हौशी खेळाडूंना क्रिकेटच्या आणि फुटबॉलच्या मॅचेस किंवा सामने खेळण्याकरता केला जातो. लोकमान्य गुरुकुल क्रीडा संकुलामध्ये ही सुविधा




उपलब्ध केली आहेच परंतु त्याच बरोबर सर्वात महत्त्वाचे म्हणजे बास्केटबॉल, फुटबॉल आणि क्रिकेट याच्या करता प्रशिक्षणाची देखील सोय या क्रीडा संकुलामध्ये उपलब्ध केली गेली आहे. टिळक नगर शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यवाह नितेश्री काबाडी यांनी सांगितले की "डोंबिवलीकरांची गरज ओळखून आम्ही या क्रीडा संकुलात विविध खेळांच्या सुविधा उपलब्ध करून देत आहोत. त्यामुळे लवकरच डोंबिवलीचे नाव विविध क्रीडा प्रकारांमध्ये देखील उंचावले जाईल याची आम्हाला खात्री वाटते. डोंबिवलीकर युवक आणि सर्वसामान्य डोंबिवलीकरांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

या क्रीडा संकुलाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे याचे बुकिंग ऑनलाईन पद्धतीने करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

लोकमान्य गुरुकुल क्रीडा संकराचा उद्घाटन सोहळा रविवार दिनांक २६ जानेवारी २०२५ या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता आयोजित करण्यात आला आहे. डोंबिवलीकरांचे लाडके आमदार तसेच भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या हस्ते याचे उद्घाटन होणार आहे. तसेच कल्याण ग्रामीण मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार राजेश मोरे हे देखील या कार्यक्रमास विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत. सर्व डोंबिवलीकर नागरिकांना मंडळातर्फे कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाणे महानगरपालिकेत राष्ट्रीय मतदार दिवस साजरा



**ठाणे (विशाल कारंडे) :** पंधराव्या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे मतदान शपथ घेण्यात आली. त्याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, विधी अधिकारी मकरंद काळे, महिला व बालविकास अधिकारी दयानंद गुंडप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मतदान हा प्रत्येकाचा अधिकार आहे आणि तो प्रत्येकाने बजावला पाहिजे याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला जातो. यावेळी, भारत निवडणूक आयोगाने 'मतदानासारखे दुसरे काही नाही, मी मतदान करणारच' अशी संकल्पना निश्चित केली आहे. त्याची माहिती अधिकारी आणि कर्मचारी यांना देण्यात आली. त्यानंतर, सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मतदान करण्याबाबतची शपथ घेतली.

# ठाणे महानगरपालिका क्षेत्रात हवा प्रदूषण रोखण्यासाठी नियम न पाळल्यामुळे विकासकांना काम थांबवण्याचे आदेश देण्यास सुरूवात

**ठाणे (राकेश गायकवाड) :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम सुरू असताना हवा प्रदूषण रोखण्यासाठीचे नियम न पाळल्यामुळे विकासकांना काम थांबवण्याचे आदेश देण्यास शहर विकास विभागाने सुरूवात केली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी महापालिकेमार्फत विविध उपाय केले जात आहेत. त्यानुसार, महापालिकेने धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी एकूण ३१७ बांधकाम व्यावसायिकांना हवा प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश दिले होते. त्यापैकी १८२ ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून नियमांच्या पूर्ततेसोबतच ०९ लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. या नियमावलीचे पालन न करणाऱ्या १२० बांधकाम व्यावसायिकांना काम का थांबवू नये यासाठी कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांच्यापैकी ज्यांनी नियमांची पूर्तता केल्याचा अहवाल दिला आहे त्याची पडताळणी केली जात आहे. नोटीस बजावण्यात आलेल्या सात विकासकांनी नियमांची पूर्तता न केल्याने त्यांना काम थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे यांनी दिली आहे.

हवा प्रदूषण नियंत्रणासाठी असलेल्या नियमावलीचे तसेच त्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याची सूचना महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली आहे. त्यासंदर्भात, सर्व बांधकाम स्थळांना अचानक भेट देऊन सर्व नियमांचे पालन होत असल्याची खात्री पर्यावरण विभागाने सतत करावी, असेही स्पष्ट करण्यात आले होते. या पाहणीत ज्यांनी नियमावलीचे पालन केलेले नाही अशा बांधकाम स्थळांचा अहवाल प्राप्त झाल्यावर १४ ते १६ जानेवारी या काळात विकासकांना बांधकाम थांबविण्याच्या नोटीसा शहर विकास विभागाने बजावल्या. मौजै नौपाडा येथील मे. स्कायलाईन इन्फ्रा, मौजै ठाणे येथील सुयश पाटणकर, मौजे माजिवडे येथील मे. अष्टविनायक एंटरप्रायझेस, सेवा रस्ता येथील मे. पद्मनाभ डेव्हलपर्स, मौजै पारसिक येथील मे. सरस्वती एंटरप्रायझेस, मौजै पारसिक येथील मे. जय प्रॉपर्टीज, मौजे कळवा येथील मे. सिद्धीविनायक डेव्हलपर्स यांना बांधकाम थांबवण्याची नोटीस देण्यात आली आहे.

काही विकासकांकडून नियमावलीची पूर्तता केल्याचे निवेदन शहर विकास विभागास प्राप्त झाले आहे. त्याची पडताळणी केल्यावरच बांधकाम पुन्हा सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तसेच, यापुढेही कोणाकडून नियमावलीचे पालन न झाल्यास अशाप्रकारे कारवाई करण्यात येईल, असेही संग्राम कानडे यांनी स्पष्ट केले आहे.

# संविधान परिचय कार्यशाळेतून परिमंडळ १ अधिकारी, कर्मचारी यांच्यासमोर उलगडले संविधानाचे महत्व

**ठाणे (विवेक गुंजाळ) :** भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'हर घर - संविधान साक्षर' ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आधीपासूनच आघाडी घेतली आहे. यापूर्वीही ३ डिसेंबर २०२४ रोजी नमुंमपाच्या उच्चपदस्थ अधिकारी यांचेकरिता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली याठिकाणी संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त मुख्य सचिव श्री. जे.एस.सहारिया यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले होते. याचाच पुढचा भाग म्हणून महानगरपालिकेच्या परिमंडळनिहाय अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता एकदिवसीय 'संविधान परिचय कार्यशाळा' आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले व



त्याची अंमलबजावणी आज महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रामध्ये परिमंडळ १ मधील अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता करण्यात आली. याप्रसंगी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विशद करताना उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे यांनी संविधानाचे महत्व घराघरात व मनामनात पोहचविण्यासाठी कटिबध्द राहून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नियोजनबध्द पावले उचलली जात असल्याचे सांगितले. यावेळी महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या नियंत्रक सल्लागार श्रीम.संध्या अंबादे व इतर मान्यवर उपस्थित होते. या एकदिवसीय कार्यशाळेत सुप्रसिध्द लेखक व संविधान अभ्यासक श्री.सुरेश सावंत यांनी 'संविधान म्हणजे काय? संविधान का व कशासाठी? त्याची निर्मिती प्रक्रिया व स्वरुप, त्यातील जीवनस्पर्शी मूल्ये तसेच संविधानातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये' अशा विविध विषयांवर माहिती देत कार्यशाळेत सहभागी अधिकारी, कर्मचारी यांच्यामार्फत जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत संविधानाचे महत्व पोहचावे असे आवाहन केले. यावेळी त्यांनी उपस्थित श्रोत्यांशी संवाद साधत त्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. अशाच प्रकारची कार्यशाळा परिमंडळ २ विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिताही आयोजित करण्यात येत आहे.

# दिव्यांग व्यक्तींनी पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत मिळवण्याकरिता अर्ज सादर करावे

**पालघर (सतीश सोनावणे) :** पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना लागू करण्यासंदर्भात दिनांक १०.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, मर्या. यांच्या स्तरावरुन सुरु आहे.

**योजनेचा उद्देश**

दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे.

**दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे.**

सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार/कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे.

प्रस्तुत योजनेचा लाभ राज्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी (अर्ज करण्यासाठी) पोर्टलवरती दिव्यांग व्यक्तींकडून ऑनलाईन अर्ज मागविणेसाठी https://register.mshfdc.co.in हि लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर लिंकद्वारे दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दिनांक ०६.०२.२०२५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

# बाल विकास प्रकल्प, पालघर नागरी अंतर्गत "बेटी बचाओ बेटी पढाओ" मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**पालघर (सुचिता सोनावणे) :** बाल विकास प्रकल्प, पालघर नागरी अंतर्गत अंगणवाडी केंद्र वेऊर येथे "बेटी बचाओ बेटी पढाओ" या अभियानाअंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिवेश पष्टे (अन्न तंत्रज्ञ व आरोग्य सेवक) उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रवीण भावसार, बाल विकास प्रकल्प अधिकारी, यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्यसेविका तृप्ती भोये आणि अंगणवाडी सेविका यांनी कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केला.या कार्यक्रमात ६५ विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला. मुलींना शिक्षण, पोषणयुक्त आहार, आरोग्य, स्वच्छता व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. शालेय विद्यार्थिनींना या



विषयांची महत्त्वपूर्ण माहिती देत त्यांचे मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रेरित करण्यात आले.

**कार्यक्रमाची वैशिष्ट्ये**

शिक्षण: शिक्षणाच्या महत्त्वावर भर देत मुलींना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

आहार: पोषणयुक्त आहारामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या सकारात्मक परिणामांची माहिती देण्यात आली.

आरोग्य व स्वच्छता: आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेचे महत्त्व आणि त्यासंबंधीच्या मूलभूत सवयी विकसित करण्यावर चर्चा झाली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित शालेय विद्यार्थिनींनी आपले प्रश्न विचारून मार्गदर्शन घेतले. अशा उपक्रमांमुळे मुलींच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्याला आधार मिळतो.

मुख्यसेविका, अंगणवाडी सेविका आणि बाल विकास प्रकल्प पालघर नागरी यांचा सहभाग कौतुकास्पद असून त्यांनी शालेय विद्यार्थिनीच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढाकार घेतला.

# इंस्टाग्रामवर SRK ला इन्फ्लुएंसरकडून धोबीपछाड



बॉलीवूडचा बादशाह म्हणजेच अभिनेता शाहरुख खान. जो कायम वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. कधी आगामी सिनेमा तर कधी खाजगी आयुष्यातील घडामोडींमुळे त्याच्याबद्दल सतत बोललं जातं. गेली कित्येक वर्षे तो बॉलिवूड सिनेविश्वातील चमचमत्या ताऱ्यांच्या यादीत बैठक मांडून बसला आहे. त्यामुळे साहजिकच त्याचा चाहता वर्ग फार मोठा आहे. शाहरुख खान सोशल मीडियावर बराच सक्रिय असतो. ज्याच्या माध्यमातून तो विविध पोस्ट शेअर करून आपल्या चाहत्यांच्या संपर्कात राहताना दिसतो. दरम्यान, सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवर त्याला फॉलो करणाऱ्यांची संख्या बऱ्यापैकी मोठी आहे. असे असूनही इंस्टाग्रामवर मात्र वेगळे चित्र दिसत आहे. एका इन्फ्लूएंसरने फॉलोवर्सच्या बाबतीत चक्क बॉलिवूडच्या बादशाहला धोबीपछाड दिलाय. चला याविषयी सविस्तर जाणून घेऊया. दिवसागणिक सोशल मीडियावर सक्रिय राहणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. त्यामुळे मराठी असो वा बॉलिवूड, टॉलिवूड सगळे सेलिब्रिटी सोशल मीडियावर ॲक्टिव्ह आहेत. न केवळ कलाकार तर नेतेमंडळीसुद्धा सोशल मीडियाचा वापर करतात. आजचं जग आधुनिक असल्याचा परिणाम म्हटलं तरी चालेल. पण सोशल मीडिया जणू काळाची गरज झाली आहे. या माध्यमातून बरेच लोक आपले विचार आणि मत प्रकट करताना दिसतात. तर बरेच लोक रिल्स करणे आणि पाहणे यातच व्यस्त असतात. म्हणूनच गेल्या काही काळात रिल्स स्टार्सची मोठी डिमांड आली आहे. यापैकी एक म्हणजे जन्नत झुबेर. टिकटॉकच्या माध्यमातून चर्चेत आलेली जन्नत झुबेर पुढे इंस्टाग्रामवर विविध आशयाचे व्हिडीओ बनवून ती सोशल मीडिया इन्फ्लूएंसर म्हणून ओळखली जाऊ लागली. आज जन्नतला इंस्टाग्रामवर फॉलो करणाऱ्यांची संख्या ४९.७ मिलियन इतकी आहे. तर गेली अनेक वर्ष सिनेविश्वात कार्यरत असलेल्या आणि बॉलिवूडचा बादशाह अशी ओळख असलेल्या शाहरुख खानचे ४७.७ मिलियन इतके फॉलोवर्स आहेत. अर्थात जन्नतने बॉलिवूडच्या SRK ला तब्बल २ मिलियनने मागे टाकलंय.

## कलाकारांपेक्षा जास्त रीलस्टार्सची चर्चा

गेल्या काही वर्षात कलाकारांपेक्षा जास्त रीलस्टार्स अधिक चर्चेत असल्याचा वारंवार प्रत्यय आला आहे. याविषयी बऱ्याच कलाकारांनी आपापली मते प्रकट केली आहेत. मध्यंतरी मालिकांमध्ये काम करण्यासाठी दिले जाणारे प्राधान्य आणि मानधन यावर बोलताना काही मराठी तसेच हिंदी कलाकारांनी खदखद व्यक्त केली आहे. ज्यात काहींनी सिनिऑरिटीचा मुद्दा देखील ठळक केला होता.

# तेजश्री सुबोधच्या फोटोशूटची सोशल मीडियावर हवा



गेल्या महिन्यात २० डिसेंबर २०२४ रोजी प्रदर्शित झालेला 'हॅशटॅग तदेव लग्नम' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस पडला आहे. या चित्रपटातून अभिनेता सुबोध भावे आणि अभिनेत्री तेजश्री प्रधान यांनी पहिल्यांदाच रुपेरी पडद्यावर स्क्रीन शेअर केली. त्यांची ही नवीकोरी फ्रेश जोडी प्रेक्षकांना भावली आणि त्यामुळे चित्रपटाला चांगला प्रतिसाद लाभला. अशा या नव्या जोडीचं एक भन्नाट कँडिड फोटोशूट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यामध्ये सुबोध आणि तेजश्रीचा निखळ अंदाज लक्ष वेधून घेतोय.

अभिनेता सुबोध भावे आणि अभिनेत्री तेजश्री प्रधानचं सोशल मीडियावर एक फोटोशूट व्हायरल होत आहे. ज्यामध्ये तेजश्रीने पेस्टल हिरव्या रंगाचा कुर्ता आणि पांढरी पॅन्ट परिधान केली आहे. तर अभिनेता सुबोध भावेने केशरी रंगाचे स्ट्राइप्स शर्ट आणि डेनिम जीन्स परिधान केली आहे. हे फोटो आनंद दिलीप गोखले लिखित, दिग्दर्शित 'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान क्लिक केलेले आहेत. प्रसिद्ध फोटोग्राफर शशांक सानेने त्याच्या अधिकृत सोशल मीडिया हॅण्डल इंस्टाग्रामवर हे फोटो शेअर केले आहेत. ज्यावर नेटकऱ्यांच्या बऱ्याच कमेंट्स येताना दिसत आहेत.

'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर उत्तम कामगिरी केली आहे. एक साधी, सोपी आणि सुटसुटीत गोष्ट जी फॅमिलीसोबत पाहणं अगदीच शक्य आहे असा हा सिनेमा आहे. या व्हायरल फोटोशूटवर सर्वाधिक लोकांनी तेजश्री प्रधानला 'प्रेमाची गोष्ट' ही मालिका का सोडलीस? अशी विचारणा केली आहे. तर काहींनी तेजश्रीने मालिकेत परत यावे, अशी इच्छा व्यक्त केली आहे.

अभिनेत्री तेजश्री प्रधानच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर तिने आजवर विविध मालिका तसेच मराठी आणि हिंदी चित्रपट केले आहेत. 'होणार सून मी ह्या घरची' आणि 'अगंबाई सासूबाई' या मालिकांमध्ये तिने साकारलेल्या भूमिकांना प्रेक्षकांकडून विशेष प्रेम मिळाले. नुकतीच तिने स्टार प्रवाहवरील 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेतून एक्झिट घेतली आहे. या मालिकेत ती मुक्ता हे मध्यवर्ती पात्र साकारत होती.

# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम नम्रता संभेराव-संजय नार्वेकर यांचा 'हा' फोटो कोणत्या चित्रपटातील आहे ओळखा पाहू?



'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी लॉली म्हणजे नम्रता संभेराव खूप चर्चेत असते. या कार्यक्रमाव्यतिरिक्त आता नम्रता वेगवेगळ्या चित्रपट, नाटकांमधून विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. नम्रता सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. रील व्हिडीओ, फोटो शेअर करून अभिनेत्री नेहमी चाहत्यांच्या संपर्कात असते. यामाध्यमातून ती सतत आपल्या चाहत्यांना हसवण्याचा प्रयत्न करत असते. नुकताच तिने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक फोटो शेअर केला आहे; ज्यामुळे तिच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे.

नम्रता संभेरावने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या फोटोमध्ये ती अभिनेते संजय नार्वेकर यांच्याबरोबर पाहायला मिळत आहे. संजय नार्वेकर यांच्या हातात खोटं धनुष्यबाण दिसत आहे. तर नम्रता साडीत पाहायला मिळत आहे. यावेळी ती संजय नार्वेकरांकडे आश्चर्याने बघताना दिसत आहे.

नम्रता संभेरावची इन्स्टाग्राम स्टोरी

२००६मध्ये प्रदर्शित झालेल्या एका चित्रपटातील नम्रता आणि संजय नार्वेकरांचा हा फोटो आहे. विजय पाटकर यांचं दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटात तगड्या कलाकारांची फौज पाहायला मिळाली होती. अभिनेते संजय नार्वेकर यांच्यासह विजय चव्हाण, दीपाली सय्यद, विजय कदम, प्रदीप पटवर्धन, किशोरी अंबिये, जॉनी लिव्हर, श्रीरंग गोडबोले, पूर्णिमा अहिरे, रसिका जोशी, दीपक शिर्के, निशा परुळेकर, सुनील तावडे, अरुण नलावडे, रमेश वाणी असे अनेक कलाकार मंडळी या चित्रपटात झळकले होते.

या चित्रपटात एक झपाटलेली चाळ असते. या चाळीत राजाराम नावाचा गृहस्थ असतो. त्याच्या आयुष्यात बरीच उलथापालथ होते. एक लोभी बिल्डर त्यांची झपाटलेली चाळ पुनर्विकासासाठी घेण्याचा प्रयत्न करतो. पण राजारामकडे पूर्वाजांचा जादूचा चष्मा असतो. हा चष्मा घालून जे पुस्तक वाचेल त्या पुस्तकातील कोणत्याही पात्रात रुपांतरित होत असतो. यावरून ओळखचं असेल हा चित्रपट कोणता असेल?

"कंठ दाटून आला अन्…", २७ वर्षांनंतर 'सत्या' चित्रपट पाहिल्यावर राम गोपाल वर्मा यांची 'अशी' झाली होती अवस्था; म्हणाले, "यशामुळे आंधळा…"

नम्रता आणि संजय नार्वेकराचा हा फोटो 'चश्मेबहाद्दर' या चित्रपटातील आहे. अजूनही हा चित्रपट तितक्याच आवडीने आज पाहिला जातो. या चित्रपटातील गाणी तेव्हा खूप लोकप्रिय झाली होती. काल्पनिक कथेवर आधारित असलेला 'चश्मेबहाद्दर' हा कॉमेडी चित्रपट प्रेक्षकांना खळखळून हसवतो.

# मुलगी झाली हो! शशांक केतकर दुसऱ्यांदा झाला बाबा, लेकीचं नाव ठेवलंय खूपच खास



शशांक केतकरने यंदा नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्याच्या तमाम चाहत्यांना तो लवकरच दुसऱ्यांदा बाबा होणार असल्याची आनंदाची बातमी दिली होती. शशांक व त्याची पत्नी प्रियांका ढवळे यांनी सुंदर असं मॅटर्निटी फोटोशूट करत लवकरच आई-बाबा होणार असल्याचं सर्वांना सांगितलं होतं. यानंतर संपूर्ण कलाविश्वातून अभिनेत्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला होता. शशांक मुलगा होणार की मुलगी याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर आता अभिनेत्याने घरी 'लक्ष्मी'चं आगमन झाल्याची गोड बातमी इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे.शशांक केतकरला मुलगी झाली आहे. "आता खऱ्या अर्थाने कुटुंब पूर्ण झालं. घरात लक्ष्मी आली…" असं म्हणतं अभिनेत्याने त्याच्या चिमुकल्या लेकीचं नाव देखील जाहीर केलं आहे. 'ठरलं तर मग' म्हणत सायलीचा नवा निश्चय! अर्जुन-प्रियाच्या लग्नाची बातमी पोहोचताच…; 'या' दिवशी असेल विशेष भाग, पाहा प्रोमो शशांकने वैयक्तिक आयुष्यात ४ डिसेंबर २०१७ मध्ये त्याची मैत्रीण प्रियांका ढवळेबरोबर लग्न केलं. शशांक व प्रियांका यांनी २०२१ मध्ये त्यांच्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं होतं. अभिनेत्याच्या मोठ्या मुलाचं नाव ऋग्वेद असं आहे. आता 'हम दो हमारे दो' असं म्हणत शशांकने त्याच्या लेकीचं नाव 'राधा' ठेवलं असल्याचं जाहीर केलं आहे. शशांकने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर कौटुंबिक फोटो शेअर केला आहे. यावर प्रियांका, शशांक, ऋग्वेद, राधा अशी चौघांची नावं लिहिल्याचं पाहायला मिळत आहे.

शशांकने मुलगी झाल्याची गोड बातमी देताच नेटकऱ्यांनी या पोस्टवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. मराठी कलाकारांसह अभिनेत्याच्या चाहत्यांनी प्रियांका आणि शशांक यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. गणरायाच्या साक्षीने नवीन सुरुवात! २४ वर्षीय अभिनेत्याने उरकला साखरपुडा, नेपाळमधील मंदिरातून शेअर केला होणाऱ्या पत्नीबरोबरचा फोटो दरम्यान, शशांकच्या कामाबद्दल सांगायचं झालं, चित्रपट, नाटक, मालिका, वेबसीरिज अशा चारही माध्यमांमध्ये त्याने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. सध्या तो 'स्टार प्रवाह' वाहिनीच्या 'मुरांबा' या मालिकेत मध्यवर्ती भूमिका साकारत आहे. या मालिकेला प्रेक्षकांची सुद्धा चांगली पसंती मिळत आहे. शशांकसह या मालिकेत अभिनेत्री शिवानी मुंढेकर प्रमुख भूमिकेत झळकली आहे.

# रामचरण-कियारा अडवाणीचा फ्लॉप 'गेम चेंजर' महिनाभरातच ओटीटी वर रिलीज होणार




रामचरण आणि कियारा अडवाणीचा 'गेम चेंजर' बॉक्स ऑफिसवर मोठ्या थाटामाटात प्रदर्शित झाला होता. पण प्रेक्षकांनी त्याला खूप थंड प्रतिसाद दिला. १० जानेवारी २०२५ रोजी रिलीज झालेल्या या चित्रपटाने १२ दिवसांत देशभरात १४७ कोटी रुपये कमावले आहेत. निर्माते झालेल्या तोट्यातून बाहेर पडण्यासाठी लवकरच या चित्रपटाला ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज करण्याची तयारी करत आहेत. हा चित्रपट पुढच्या महिन्यात, म्हणजेच फेब्रुवारीमध्ये ओटीटी प्लॅटफॉर्मवर स्ट्रीम होऊ शकतो. शंकर यांनी दिग्दर्शन केलेल्या 'गेम चेंजर'च्या ओटीटी रिलीजसंबंधी 'ओटीटी प्ले' ने ही माहिती दिली आहे. या रिपोर्टमध्ये 'गेम चेंजर'च्या निर्मात्यांशी संबंधित एका जवळच्या सूत्राच्या हवाल्याने सांगितले की, 'चित्रपट निर्माते दिल राजू यांनी प्रसिद्ध ओटीटी प्लॅटफॉर्म Amazon Prime Video बरोबर मोठा करार केला आहे. हा करार पक्का झाला आहे आणि 'गेम चेंजर' येत्या फेब्रुवारी २०२५ मध्ये प्लॅटफॉर्मवर रिलीज होऊ शकतो. हॉरर सिनेमे बघायला आवडतात? नेटफ्लिक्सवरील 'हा' भयंकर चित्रपट पाहून हादरून जाल 'गेम चेंजर' ओटीटी वर कधी आणि कुठे रिलीज होईल?.

# गणरायाच्या साक्षीने नवीन सुरुवात! २४ वर्षीय अभिनेत्याने उरकला साखरपुडा, नेपाळमधील मंदिरातून शेअर केला होणाऱ्या पत्नीबरोबरचा फोटो



मालिकाविश्वात लगीनघाई सुरू आहे. मागील काही दिवसांत अनेक मराठी व हिंदी कलाकार लग्नबंधनात अडकले आहेत, तर काहींनी प्रेमाची कबुली दिली. आता २४ वर्षीय अभिनेत्याने एक फोटो शेअर करून चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. हा अभिनेता लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे.

टीव्ही मालिका 'बालवीर' मधून लोकप्रिय झालेला अभिनेता देव जोशीने साखरपुडा केला आहे. त्याने त्याची गर्लफ्रेंड आरतीबरोबर एक फोटो शेअर करून ही आनंदाची बातमी दिली आह. देवने आधी एक व्हिडीओ शेअर केला, ज्यात तो व आरती एकमेकांचे हात पकडताना दिसत आहेत. दुसऱ्या फोटोमध्ये देव व आरती एका मंदिरासमोर उभे असलेले पाहायला मिळतात.

आग लावणारा ट्रेलर, विकीला यंदा सगळे अवॉर्ड्स…; 'छावा'च्या ट्रेलरवर कमेंट्सचा पाऊस, मराठी कलाकार काय म्हणाले? देवने शेअर केलेल्या पहिल्या व्हिडीओत गणरायाच्या मूर्तीसमोर देव व आरती एकमेकांचे हात हातात घेताना दिसतात. असं कॅप्शन देवने व्हिडीओला दिलं आणि हॅशटॅगमध्ये त्याने साखरपुडा केल्याचं सांगितलं. दुसऱ्या फोटोत देव व आरती नेपाळमधील कामाख्या मंदिरात दिसत आहेत. दोघांच्या गळयात रुद्राक्षांची माळ व कपाळावर टिळा पाहायला मिळत आहे. मंदिरातील हा फोटो शेअर करून आयुष्यभर प्रेमाने एकत्र राहायचं ठरवलंय, अशा आशयाचं कॅप्शन देवने दिलं आहे. देवने शेअर केलेल्या या फोटोवर चाहते तसेच मालिकाविश्वातील त्याचे सहकलाकार कमेंट्स करून त्याला शुभेच्छा देत आहेत. आश्का गोराडिया, खुशी भारद्वाज, अनिरुद्ध दवे, पवित्रा पुनिया, चारू मलिक यांनी देव व आरतीचं अभिनंदन केलं आहे.देव जोशीने बाल कलाकार म्हणून 'महिमा शनि देव की' मधून टीव्ही इंडस्ट्रीत पदार्पण केलं होतं. मग त्याने 'काशी- अब ना रहे तेरा कागज कोरा' मध्ये लहान शौर्याची भूमिका साकारली होती. मात्र 'बालवीर' आणि त्याचा दुसरा भाग 'बालवीर रिटर्न्स' मध्ये मुख्य भूमिका साकारून देव खूप लोकप्रिय झाला. त्याने चंद्रशेखर आझाद यांची बालपणीची भूमिकाही साकारली होती.




**मेष** – नव्या खरेदीचा मोह टाळा. मानसिक उत्साह जाणवेल. तुम्ही केलेले प्रयत्न यशस्वी होतील. प्रगतीचा नवा मार्ग शोधणे शक्य होईल.

**वृषभ** – आपल्या घरातील वडीलधाऱ्यांच्या सल्ल्याचे पालन करा. व्यवहारात अत्यंत चाणाक्ष राहावे लागेल. प्रवासात कधीही घाई करू नका.

**मिथुन** – वैवाहिक जीवनात सुख समाधान नांदेल. आर्थिक व्यवहार करताना सावध राहा. तुमचा आत्मविश्वास वाढेल. कलेत मन रमेल.

**कर्क** – आपल्या कार्यपद्धतीत योग्य तो बदल करा. आपल्या जबाबदारीत वाढ होणार आहे. आर्थिक लाभ होईल. प्रतिष्ठा सांभाळता येईल.

**सिंह** – आपल्याकडून कुणाचा अवमान होणार नाही याची काळजी घ्या. आपल्या आर्थिक व्यवहारास चालना मिळेल. धंद्यात वाढ होईल.

**कन्या** – विरोधकांना आपल्या बाजूने वळवता येईल. आर्थिक लाभाचे योग येतील. तुम्ही हाती घेतलेल्या कार्यास योग्य गती प्राप्त होईल.

**तूळ** – नोकरीधंद्यातील अधिकाराचा योग्य वापर करा. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. प्रगतीचे संकेत मनास समाधान प्रदान करतील.

**वृश्चिक** – घरातील कामे होतील. क्षुल्लक ताणतणावाचा सामना करावा लागेल. आपल्या श्रमाचे योग्य मूल्यांकन केले जाईल. संयम राखा.

**धनु** – धंद्यातील चर्चा संयमाने करा. मन स्थिर ठेवता येईल. वाहन जपून चालवा. प्रतिष्ठित व्यक्तींची ओळख होईल. गैरसमज दूर होईल.

**मकर** – वरिष्ठ खूश होतील. महत्त्वाचे काम रेंगाळत ठेवू नका. योग्य निर्णय घेता येईल. जबाबदारीचे पालन करण्याकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ** – आर्थिक व्यवहारात लाभाचे योग येतील. बुद्धिचातुर्याने कामास गती प्राप्त होईल. आप्तेष्टांना मदत करावी लागेल. नोकरीत काम वाढेल.

**मीन** – बोलताना वाहवत जाऊ नका. आर्थिक व्यवहारात तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्या. वरिष्ठांचा पाठिंबा आपल्या मनास समाधान प्रदान करेल.

# सातार्‍यात आंदोलनानंतर ठेकेदार काळ्या यादीत, वन विभागाची चौकशी

सातारा (दिगंबर जाधव) : सातारा शहरातील सामाजिक, माहिती अधिकार, पर्यावरणप्रेमी सुशांत मोरे यांनी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवार दि.२३ पासून विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरु केले होते. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत श्री. मोरे यांच्या मागण्यांबाबत निर्णय घेतला. कायद्याच्या रक्षणकर्त्यांकडूनच दुर्लक्ष होत असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांना आंदोलन करावे लागते. अशी ही सातार्‍याची तर्‍हा जग जाहीर झाली आहे.

नेहमीच आंदोलन केल्याशिवाय सातार्‍यात न्याय मिळत नाही. ही एक प्रथा झालेली आहे. याला सर्वस्वी जबाबदार राज्यकर्ते व अधिकारी आहेत. हे सुद्धा या निमित्त अधोरेखित झालेले आहे.सातारा नगरपालिकेच्या ठेकेदारास खोटी कागदपत्रे दिल्याने काळ्या यादीत टाकण्यात आले. वन विभागातील गैरकारभाराची ४५ दिवसात चौकशी होऊन कारवाई केल्याचा अहवाल देणे, झाडाणी येथील विद्युत कनेक्शनबाबतही तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. तर महसूल, नगरविकास, जि.प.सह विविध विभागातील मागण्यांबाबत प्रशासनातील अधिकार्‍यांनी भेट देऊन कारवाई करण्याचे ठोस आश्वासन दिल्याने श्री. मोरे यांनी उपोषण स्थगित केले. उपजिल्हाधिकारी श्री विक्रांत चव्हाण यांच्या हस्ते सरबत घेऊन श्री. मोरे यांनी उपोषण सोडले. कार्यकर्त्याला उपोषण का करावे लागते ? याबाबत मात्र कुणीच खुलासा केला नसल्याने जिल्हा प्रशासनाचे खाजगीकरण झाल्यास नवल वाटणार नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. श्री. मोरे यांनी विविध प्रकरणातील माहिती अधिकारानुसार कागदपत्रे मिळाल्यानंतर दोषींवर कारवाई करावी अन्यथा सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला होता. माहिती सुद्धा दिली पण कारवाई होत नाही. त्याला प्रशासन तरी कसे म्हणावे ? संबंधित यंत्रणेला जनाची नाही पण मनाची ही वाटत नाही. प्रामुख्याने जावळी वर्गातील वन अधिकार्‍यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीचा गैरवापर केला आहे. जर जिल्हा नियोजन अधिकारी जर कामवाटप समितीचे निगराणी करत असेल तरी




इतरांबद्दल न बोललेलं बरे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. लवकरच त्यांची उचल बांगडी होण्याची संकेत मिळत आहे. झाडाणी येथील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात वीज कनेक्शन घेऊन वीज मंडळाच्या अधिकार्‍यांनी चांगलाच उजेड पाडला आहे. नगरपालिकेचा ठेका घेताना ठेकेदाराने दिलेली खोटी कागदपत्रे सादर केली त्याची पडताळणी करण्याची तसदी भ्रष्ट अधिकार्‍यांनी घेतली नाही.

वन विभागाच्या तक्रारीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीस सहाय्यक उपवनसंरक्षक झांझुर्णे, श्री. रौधंळ उपस्थित होते. यावेळी वन विभागाने केलेल्या कामांची ४५ दिवसात चौकशी करुन त्याबाबत काय कारवाई केली ? याचा अहवाल देण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नागेश पाटील यांनी यावेळी दिल्या. सातारा नगरपालिकेच्या दलित वस्तीच्या कामातील निविदा घेताना ठेकेदार कुणाल गायकवाड, पुणे यांनी निविदेसोबत खोटी कागदपत्रे जोडल्याचे माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रानुसार स्पष्ट झाले होते. याबाबत मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी कुणाल गायकवाड यांना यापुढे निविदे प्रक्रियेत सहभाग घेण्यास मनाई करत काळ्या यादीत टाकले आहे. त्याचप्रमाणे झाडाणी येथील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात देण्यात आलेल्या वीज कनेक्शनबाबत कारवाई करण्याची मागणी श्री. मोरे यांनी केली होती. याबाबत महावितरणच्या अधिक्षक अभियंता यांनी याबाबत चौकशी सुरु असून लवकरच दोषींवर कारवाई करणार असल्याचे ठोस आश्वासन दिले. तसेच इतर विविध मागण्यांबाबत विविध विभागाच्या अधिकार्‍यांनी ठोस कारवाई करण्याचे आश्वास दिल्याने श्री. मोरे यांनी उपोषण स्थगित केले. उपोषण सोडल्यानंतर बोलताना श्री. मोरे यांनी प्रशासनाने केलेल्या कार्यवाही बद्दल आभार मानले. त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना २००५ च्या कायद्यानुसार दोन पेक्षा अपत्य असल्यास त्यांच्यावर कारवाई करावी यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालकल्याण रोहिणी ढवळे आणि सर्व तालुक्यांचे बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती परंतु त्यांनी खोटी माहिती दिल्याचे पडताळणी अंती स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात पुणे येथील महिला व बालकल्याण आयुक्त यांच्या दालनासमोर दि. ३ मार्च २०२५ पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही श्री. मोरे यांनी यावेळी दिला. कोयना धरण शिवसागर जलाशयावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुनावळे ता. जावळी येथे जागतिक दर्जाचा जलपर्यटन प्रकल्प विकसित करताना बांधकाम व पायाभूत सुविधांच्या तसेच बोटी व जलपर्यटन संबंधित कामांच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे. तो आता वर्षभरानंतर उघड झालेले आहे त्यामुळे खरे लाभार्थी यांचे शोध घेणे गरजेचे असल्याची चर्चा मुनावळे परिसरात सुरू झालेली आहे.

SPORT

# Rohit's Ranji Returns Sparks Debate; Mumbai Drop In-Form 17-Year-Old Star, Who Recently Broke Jaiswal's World Record

**NEW DELHI :** Following the Board of Control for Cricket in India's (BCCI) strict diktat following the team's humiliating Test series defeats to New Zealand and Australia, the top stars of Indian cricket turned up to play the first round of the Ranji Trophy in the second leg of the 2024-25 season, with Rohit Sharma being the most notable name.

Rohit turned up to play in India's premier first-class competition for the first time since 2015 and became the first Indian Test captain to play in the tournament since Anil Kumble in 2007. Rohit was part of the star-studded Mumbai team led by Ajinkya Rahane, which also included Yashasvi Jaiswal, Shreyas Iyer, Shivam Dube, and Shardul Thakur.

With both Rohit and Jaiswal returning and opening the batting for the defending champions, Mumbai dropped 17-year-old star Ayush Mhatre for their clash against Jammu & Kashmir at the MCA Sharad Pawar Academy at the Bandra Kurla Complex (BKC).

Mhatre has been the star of the season for Mumbai, as he is their second-highest run-getter in the Ranji Trophy this season. The youngster has made two centuries in red-ball cricket, including one in Mumbai's last match against Services at Delhi's Palam Stadium. He also scored a ton against Maharashtra earlier







in the season. So far, he has 408 runs in five matches at an average of 45.33. Only Shreyas Iyer has more runs for the 42-time champions this season.

The decision to drop Mhatre by Mumbai to accommodate Rohit and Jaiswal's return as openers has sparked debate on social media.

Mhatre also continued his form in the recently concluded Vijay Hazare Trophy (50-over format), in which he scored 458 runs in seven matches at an average of 65.43 with two centuries and finished as Mumbai's leading run-getter.

With a knock of 181 against Nagaland in Ahmedabad, Mhatre (aged 17 years, 168 days) broke Jaiswal's (aged 17 years, 291 days) world record for being the youngest player in the world to score a 150+ score in a List A match.

However, it will only be fair to point out the unique situation Indian cricket powerhouse Mumbai finds themselves in with some of India's best cricketers in their ranks. In a situation where all top players are available, they will be forced into making tough calls like this.

It is worth noting that Prithvi Shaw and Angrish Raghuvanshi did not even make the 17-man squad. Both Sarfaraz and Musheer Khan are absent due to injuries, while Suryakumar Yadav is absent because of international duty.

The Clash against J&K is an important one for Mumbai as they are currently third in the table with their opponent one point ahead of them. Only the top two teams in each group will qualify for the semi-finals. Mumbai will play Meghalaya in their final game of the league stage from January 30 at BKC.

Rohit and Jaiswal both departed for single digit scores as Mumbai were bowled out for 120 after winning the toss and choosing to bat first. Elsewhere, Rishabh Pant and Shubman Gill also failed to make a mark. Ravindra Jadeja was the only player that was part of India's Test squad for the Australian tour to impress as he took a five-wicket haul for Saurashtra against Delhi and scored 38 runs.

# 'Absolutely ludicrous': Australian Open fans trashed for booing Novak Djokovic after shock retirement




**NEW DELHI :** Novak Djokovic was looking as good as ever in the first set of his 2025 Australian Open semi-final against Alexander Zverev, even looking well ahead of the German for large parts of it, and so it was a shock to everyone when he retired as soon as he lost the tie-breaker. While he was applauded as he walked, there was a sizeable minority of fans at the Rod Laver Arena that booed him and Djokovic could be seen stopping, turning and put his this thumbs up towards them before leaving the court. It prompted Zverev to ask the crowd to not boo a player who has retired and American legend John McEnroe later berated the fans as well.

"They can't possibly be booing him. Please!" he stated while doing commentary for the host broadcasters. "He's won this 10 times. I mean, come on. I mean, clearly something was up," McEnroe later said on Channel Nine.

"The guy is a battler. I mean, him and Rafa [Nadal] have dug deeper than any two players I have seen. So to do that [boo], because he decided that he couldn't go on after what he's done here I thought was absolutely ludicrous, honestly. That was almost as depressing as seeing the end of the match," he said.

This isn't the first time this year that crowd behaviour has taken centre-stage at the Australian Open. American Danielle Collins had run-ins with the crowd. Collins was heckled by fans in her second round match against home favourite Destanee Aiava and she blew kisses to the crowd after winning the match. Djokovic later commended her for giving it back to the crowd. A match also had to moved to a different court after fans grew too loud at the only court at Melbourne Park which was equipped with a bar - popularly known as the "party Court". Zverev asked fans to not boo a player when they leave the court injured, especially in the case of Djokovic who was chasing an unprecedented 25th Grand Slam title and a record-extending 11th Australian Open. "Please, guys, don't boo a player when he goes out with an injury. I know everyone paid for tickets and everyone wants to see a five-set semi-final but Novak has given absolutely everything of his life to the sport the last 20 years," Zverev said as Djokovic made his way out of the court. "He has won this tournament with an abdominal tear. He has won this tournament with a hamstring tear. If he cannot continue a tennis match, he cannot. Be respectful. Really, show some love for Novak as well," said Zverev.



## 'Cummins, Bumrah IN; Smith, Kohli OUT!' ICC Announce Men's Test Team Of The Year 2024

**NEW DELHI :** Merely hours after announcing the ODI Team of the Year, ICC have now announced the Men's Test Team of the Year, and the star-studded Featured XI is captained by none other than the reigning World Test Champion skipper - Pat Cummins from Australia.

The bowling all-rounder is the only Australian to feature in the 'XI', as no other player from the nation made a cut. Interestingly, Australia and South Africa will be contesting the Final of the World Test Championship 2025 at Lord's Cricket Ground in London, England, but no player managed to feature in the Test Team of the Year 2024 except Pat Cummins. England, despite of missing out on the final by a significant margin, manages to dominate the 'XI', as the nation features 4 players, followed by India (3) and New Zealand (2). Australia and Sri Lanka have one representative each, as 5 nations combined to produced the star-studded 'XI' for Men's Test Team of the Year 2024. No Virat Kohli, Steve Smith! Well, let the reality sink in, and cricket fans must accept that there is an end to everything good. Virat Kohli and Steve Smith will go down in the history as one of the finest cricketers to have ever graced the 22 yards. However, both of them struggled for form past 18 months, but is the latter who rediscovered his purple patch in the recently-concluded Border-Gavaskar Trophy 2024 series, and stands 1 run shy off 10,000 Test runs.

# After losing spot to Rohit Sharma, Ayush Mhatre sends heartfelt message to his idol



**Mumbai :** Mumbai's 17-year-old star, Ayush Mhatre, wrote a heartfelt note to his idol, Rohit Sharma, after being dropped from the Ranji Trophy clash against Jammu and Kashmir. Mhatre had to make way for the India Test captain, who played his first Ranji match since 2015. Rohit opened alongside Yashasvi Jaiswal in Mumbai's Elite Group A clash.

Mhatre, who has scored 441 runs in five matches at an average of 40.09, expressed delight at the opportunity of sharing the dressing room with Rohit Sharma. Taking to social media, the youngster wrote: "Started playing cricket by watching him bat on television to sharing a dressing room with my idol was such an unreal moment. Lots of learning to take forward."

Mhatre made his first-class debut for Mumbai in October last year and made a name for himself with two hundreds and a fifty, which included a daddy hundred. Mhatre was in sensational touch in the Vijay Hazare Trophy, scoring 458 runs at an average of 65.42 and a strike rate of 135.50. Mhatre hit 181 against Nagaland on December 31 and followed it up with 148 against Saurashtra on January 5. However, the teenager had to make way for the India captain when Ranji Trophy resumed after the break for white-ball domestic cricket.

Rohit failed with the bat in the Ranji Trophy as he managed to score only 3 and 28 against Jammu and Kashmir, prompting the fans to question Mhatre's exclusion on social media. Despite the setback, Mhatre's focus remains on honing his skills. The teenager has scripted history by becoming the youngest player to score 150+ in a List A match, surpassing Jaiswal's record.

Mumbai's star-studded lineup, featuring the likes of Ajinkya Rahane, Shreyas Iyer, Shivam Dube, and Shardul Thakur, reflects the depth of talent in Indian domestic cricket but also creates challenges in balancing opportunities for emerging players like Mhatre.

With Prithvi Shaw and Angkrish Raghuvanshi also left out of the squad and stalwarts like Suryakumar Yadav unavailable due to international duties, competition for spots remains fierce.

Meanwhile, Shardul Thakur rescued the star-studded Mumbai team with his second first-class hundred against Jammu and Kashmir in the Ranji Trophy. Mumbai were 274/7 at stumps on day 2, taking a 188-run lead. Shardul was batting on 113 (119 balls, 13 fours) and Kotian was unbeaten on 58.

# शिंदे व फडणवीस सरकारने दावोसमधून आणलेल्या गुंतवणूकीसंदर्भात श्वेतपत्रिका काढावी : नाना पटोले

■ मद्य कंपन्यांशी करार करुन महाराष्ट्राला 'दारुराष्ट्र' करायचे आहे का ?
■ 'बुक माय शो', 'हिरानंदानी'शी करार करून सरकार काळाबाजारी व गुन्हेगारीला प्रोत्साहन देत आहे का?




● मुंबई, विशाल कारंडे :

दावोसमध्ये ६१ कंपन्यांशी केलेल्या करारातून १५.७० लाख कोटींची गुंतवणूक व १५.९५ लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राज्यात मोठी गुंतवणूक आली तर त्याचे स्वागतच केले पाहिजे पण केलेले करार व वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा जनतेला अधिकार आहे. याआधीही असेच मोठे करार झालेले आहेत म्हणून एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस सरकारने दावोसमध्ये जाऊन महाराष्ट्रात आतापर्यंत आणलेली गुंतवणूक व त्यातून निर्माण झालेले रोजगार यावर एक श्वेतपत्रिका काढावी, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे.टिळक भवनमध्ये पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, दावोसमध्ये फडणवीस यांनी करार केलेल्या ६१ कंपन्यांमधील ५१ कंपन्या भारतातीलच आहेत, यातील ४३ कंपन्या मुंबई-पुण्याच्या, तर काही कंपन्यांची कार्यालये मंत्रालयापासून हाकेच्या अंतरावरच आहेत फक्त दहा कंपन्या विदेशातील आहेत. सिडको आणि बुक माय शो यांच्या मध्ये दावोस येथे १५०० कोटी रूपयांचा करार करण्यात आला. कोल्ड प्ले च्या तिकीट विक्रीचा काळाबाजार केल्याप्रकरणी बुक माय शो ची मुंबई पोलीस चौकशी करत आहेत. तर बोगस कागदपत्रे तयार करून पवईतील जयभीम नगरमध्ये तोडक कारवाई केल्याप्रकरणी चौकशी सुरु असलेल्या हिरानंदानी कंपनीसोबतही सरकारने करार केला आहे. तसेच या कंपनीने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये घोटाळा केल्याप्रकरणी सीबीआय चौकशीही सुरु आहे. गुन्हेगार कंपन्यांसोबत करार करून सरकार त्यांना काळाबाजार करण्याची सूट देत आहे का? मुख्यमंत्र्यांनी दावोसमध्ये ज्या कंपन्यांशी करार केला त्यात दारु बनवणा-या हेनिकेन या कंपनीसोबत ७५० कोटी रुपयांचा करार केला आहे. तर AB in Bev या दुस-या बियर उत्पादक कंपनीसोबत १५०० कोटी रुपयांचा करार केला आहे.

## भंडारा कंपनीतील स्फोटाची चौकशी करा

■ भंडाऱ्यातील ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये मोठा स्फोट होऊन ५ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुःखद व वेदनादायी आहे अशा भावना व्यक्त करून नाना पटोले यांनी मोदी सरकारच्या काळात संरक्षण क्षेत्रातील कंपन्याही सुरक्षित नाहीत, या कंपनीतील स्फोट हे मोदी सरकारचे अपयश असल्याचे म्हटले आहे. आरडीएक्स बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल या कंपनीत बनवला जातो. ही घटना गंभीर असून सर्वपक्षिय खासदारांच्या समिती मार्फत या स्फोटाची चौकशी करावी अशी मागणीही पटोले यांनी केली आहे.

## उद्धव ठाकरेंच्या घोषणेचे स्वागत..

■ उद्धव ठाकरेंच्या स्वबळावर लढण्याच्या घोषणेवर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाना उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या घोषणेचे स्वागत आहे. ते शिवसेना पक्षाचे प्रमुख आहेत व प्रत्येक पक्षाला आपल्या पक्षाचे धोरण ठरवण्याचा अधिकार आहे त्यानुसार ठाकरेंनी त्यांच्या पक्षाची भूमिका मांडली आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झालेल्या नाहीत, ज्यावेळी या निवडणुका जाहिर होतील त्यावेळी स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून काँग्रेस पक्ष आपला निर्णय घेईल असे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी स्पष्ट केले.




## विशाळगड अतिक्रमणमुक्त करत दर्गा हटवा, आंदोलकांची मागणी

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

विशाळगडावरील अतिक्रमण हटवण्याची बंद असलेली मोहीम पुन्हा तातडीने सुरू करावी, मलिक रेहान दर्गा हटवावा, अशी मागणी येथे आयोजित धरणे आंदोलनावेळी करण्यात आली. हिंदू एकता आंदोलनाचे प्रदेशाध्यक्ष, माजी आमदार नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विशाळगडावरील अतिक्रमण तत्काळ हटवावे, मराठ्यांनी मारलेला मुस्लिम सरदार मलिक रेहान बाबाच्या दर्ग्याचे अतिक्रमण जमीनदोस्त करावे, गडावरील उरुसाला कायमस्वरूपी बंदी घालावी, कोणत्याही प्रकारची पशुहत्या करण्यात येऊ नये तसेच गडावरती नरवीर बाजीप्रभू देशपांडे व फुलाजी प्रभू देशपांडे यांचे स्मारक उभे करण्यात यावे, अशा मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करीत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये घुसण्याचा प्रयत्न केला.

## शाळेतल्या कथित भुताची भीती पेणमधील अंनिस कार्यकर्त्यांनी घालवली



● पेण, फरीद डावरे :

कै.सौ.म.ना. नेने कन्या विद्यालयातील काही मुली भुताच्या भीतीने घाबरल्याची माहिती डॉ. निता कदम यांनी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते संदेश गायकवाड यांना दिली. यावेळी संदेश गायकवाड यांनी ताबडतोब सदर शाळेतील मुख्याध्यापिका सविता म्हात्रे यांची भेट घेतली आणि परिस्थिती जाणून घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आल्यावर लगेच दुसऱ्याच दिवशी एक तासाचे प्रबोधनाचा सत्र घेण्याचं ठरवले. अंनिसच्या कार्यकर्त्यांनीशाळेतील मुलींचे प्रबोधन करताना घाबरलेल्या मुलींना दिलासा मिळाला व हळू हळू हसत खेळत त्यांच्या मनातील भीती काढण्यात कार्यकर्ते यशस्वी झाले. कार्यक्रम संपला तेव्हा बऱ्याच मुलींनी खूप बरं वाटतंय अस म्हणाल्या. जगदीश डंगरने चमत्कार सादर करून मुलींचा तणाव हलका केला.

संदेश गायकवाड यांनी भुताची निर्मिती, अंगात येणं म्हणजे नेमकं काय असतं, आत्मा या विषयी माहिती देऊन भूत कसं नसतं या विषयी समजावून सांगितलं. ब्रम्हराक्षस, चेटकीण, मुंजा आधी भुतांचे कार कसे अतार्किक आहेत व ते निर्माण होण्यामागची संकल्पनादेखील स्पष्ट कली. मुळात अशा प्रकारचे भास होणे, कोणीतरी नसलेली व्यक्ती समोर दिसणे, लणे, भुताचा स्पर्श होतो असे जाणवणे, हे सर्व मानसिक रुग्ण असण्याची लक्षणे आहेत किंवा त्या मनुष्याला काही मानसिक आजार जडले असल्याची शक्यता आहे. यावर मानसोपचारतज्ज्ञ योग्य उपचार करू शकतात. कोणता तांत्रिक किंवा बुवा, बाबा यावर काही करू शकत नाही, असे अंनिसच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष संजय कडू सर,मुख्याध्यापिका सौ. सविता म्हात्रे, पर्यवेक्षिका सौ . जोशी, सौ. पाटील, बंगारा सर, दिवेकर, विक्रम पाटील आणि या उपस्थित होते.

## प्रभादेवी येथे 'माय मराठी अभिजात मराठी' कार्यक्रम उत्साहात साजरा

● मुंबई, राकेश गायकवाड :



महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयामार्फत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त प्रभादेवी, मुंबई येथील करिष्मा सभागृहात 'माय मराठी अभिजात मराठी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रास्तविकात भाषा संचालक विजया डोनीकर यांनी भाषा संचालनालयाची महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच भूमिका व भविष्यातील दिशा त्याचबरोबर यावर्षीच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त भाषा संचालनालय 'मराठी भाषा : रोजगाराच्या संधी' हे आशयसूत्र घेऊन संपूर्ण महाराष्ट्रभर '३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रे' हा आगळा-वेगळा उपक्रम राबवीत असल्याचेही सांगितले. त्यानंतर डॉ.अपर्णा बेडेकर यांनी संत साहित्यातील मराठीचा भाषिक अंगाने मागोवा घेतला. संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीत कलेच्या अंगाने मराठी भाषेच्या संबंधातून भाषिक विकासाचा पट प्रेक्षकांसमोर उलगडला. कवी प्रवीण दवणे यांनी अभिजात मराठीच्या संवर्धनासाठी विविध उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे सांगितले. भावगीते व अभंग शार्दुल कवठेकर व संजना अरुण यांनी सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री प्रधान यांनी केले. कार्यक्रमाचे सादरीकरण हे उत्तरा मोने यांच्या मिती ग्रुपमार्फत करण्यात आले.

## आसगावच्या माझी वसुंधरा अभियान, ग्रामस्थांच्या एकीने ठरले स्वाभिमान....

● सातारा, दिगंबर जाधव:



माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये सहभाग घेऊन सातारा तालुक्यातील आसगाव ग्रामपंचायतीने ग्रामस्थांच्या एकीने स्वाभिमान दाखवून दिलेला आहे. या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.आसगाव येथील सर्व कुटुंब स्तरावर वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापन होत आहे.

शोषखड्डा / परसबाग / पाझरखडा, घनकचरा व्यवस्थापन करीता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंडी या बाबीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आसगावचे सरपंच सुनंदा रामदास शिंदे उपसरपंच हिरालाल शिंदे, बाजीराव शिंदे, रेश्मा शिंदे, आशा शिंदे ,लता शिंदे, प्रभा कांबळे यांच्या समवेत ग्रामविकास अधिकारी अनुजा भगत व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

स्वच्छतेची सवय अंगीकृत करण्यासाठी लोक चळवळ उभी उभी राहिल्याने ग्रामस्थांचा उत्साह वाढलेला आहे. घरातील स्वच्छते सोबतच स्वच्छ माझे अंगण आस गावची शोभा वाढवत आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा- २ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन (कुटुंबस्तर), सांडपाणी व्यवस्थापन कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता केली आहे. शौचालयाचा नियमित वापर करणे, शौचालयाची दैनंदिन स्वच्छता, शाश्वत स्वरुपात सर्व कुटुंब सदस्यांकडून वापर आणि ही सुविधा निरंतर टिकावी म्हणून आवश्यक ती देखभाल दुरुस्ती करण्यात कुटुंबांचा पुढाकार घेत आहेत. त्याबाबतही मार्गदर्शन होत आहे.

सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद्, साताराचे गटविकास अधिकारी सतीश बुध्दे सहाय्यक गटविकास अधिकारी श्री पवार यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व आसगाव मध्ये माझी वसुंधरा अभियान यशस्वी ठरले आहे. कुटुंबस्तरावर सुका कचरा, ओला कचरा कुंड्यामध्ये वर्गीकरण करणे. वर्गीकरण केलेल्या घरगुती कचऱ्याचे कंपोस्ट खतखडा अथवा घरगुती खतखड्डा निर्मिती करून कच-याचे, घर किवा घराच्या परिसरातच व्यवस्थापन करण्यात आली आहे.

## तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या कॅबिनेट मंजुरीची जबाबदारी माझी - सुनील शेळके

● मावळ, शकील शेख :



प्रस्तावित तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डीच्या कामाच्या मसुदा एमएसआयडीसीकडून महाराष्ट्राच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिवांमार्फत मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे, अशी माहिती आमदार सुनील शेळके यांनी दिली. तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाविषयीआमदार शेळके, खेडचे आमदार बाबाजी काळे आणि तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाचे (एमएसआयडीसी) व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग कृती समितीचे अध्यक्ष नितीन गाडे, उपाध्यक्ष दिलीप डोळस, सचिव अमित प्रभावळकर, सदस्य संजय चव्हाण, प्रमोद दाभाडे यांची एमएसआयडीसीच्या मुंबईतील नरिमन पॉइंट येथील कार्यालयात भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. आमदार शेळके म्हणाले, 'आगामी कॅबिनेटच्या बैठकीत तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या कामाच्या मसुद्याला तत्काळ मंजुरी द्यावी, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन पाठपुरावा करणार आहे. कॅबिनेट मंजुरीची जबाबदारी माझी आहे.' बैठकीत एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित म्हणाले, तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाचे प्रस्तावित कामासाठी राज्य शासनाने वस्तू व सेवा कर, मुद्रांक शुल्क तसेच गौण खनिज वापराबाबत सवलत द्यावी, यासंदर्भात एमएसआयडीसीकडून गेल्या १ जानेवारी रोजी प्रारूप मसुदा कॅबिनेटच्या मंजुरीसाठी पाठविला आहे.

## सैफ अली खान हल्ल्यातील आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ, २९ जानेवारीपर्यंत कस्टडी

● मुंबई, विशाल पाटील

बॉलिवूड अभिनेता सैफ हल्ला प्रकरणातील आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. आरोपीच्या पोलिस कोठडीत पाच दिवसांची वाढ करण्यात आली आहे. आरोपीला २९ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सैफ अली खान हल्ला प्रकरणातील आरोपीला १९ जानेवारीला अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. २४ जानेवारीला आरोपीला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आलं, त्यानंतर त्याला आणखी पाच दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. न्यायालयाने पोलिसांनी आरोपीच्या कोठडीत मुदतवाढ हवी आहे का, याबद्दल विचारले. यावर युक्तीवाद करताना पोलिसांनी सांगितलं की, आरोपीचा टॉवेल जप्त केला आहे, कपडे जप्त केले आहेत. त्याचे बूट शोधायचे आहेत, पण ते सापडलेले नाहीत. मिळालेल्या सीसीटीव्हीची एफएसएलकडून फेस रेकग्निशन चाचणी घ्यावी लागेल. यासाठी आम्हाला ७ दिवसांच्या कोठडीची आवश्यकता आहे.



यानंतर आरोपी आणि वकिल दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीच्या पोलिस कोठडीत पाच दिवसांची वाढ केली आहे. अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपींचे बोटांचे ठसे सैफच्या घरातून सापडलेल्या बोटांच्या ठशांशी जुळत असल्याचं फॉरेन्सिक तपासणीत उघड झालं आहे. फॉरेन्सिक तपासणीदरम्यान, अटक केलेल्या आरोपींच्या बोटांच्या ठशांसह, सैफवर हल्ला करणाऱ्या मोहम्मद शरीफुलच्या बोटांचे ठसे सैफचा मुलगा जहांगीरच्या खोलीच्या दारावर, बाथरूमच्या दारावर आणि पाईपलाईनवर आढळून आल्याचे उघड झाल्याची माहिती आहे.

## अपघातग्रस्तांना शासनामार्फत सर्वोतोपरी मदत - रोहयो मंत्री भरत गोगावले

● रायगड, फरीद डावरे :

मुंबई-गोवा महामार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. या कामादरम्यान महामार्गावर अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना शासनामार्फत सर्वोतोपरी मदत तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश रोजगार हमी योजना फलोत्पादन व खार भूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिल्या. तसेच नैसर्गिक, मानवनिर्मित अश्या कोणत्याही आपत्ती किंवा संकटाच्या वेळी मदतीसाठी सदैव तत्पर असणाऱ्या जीवनदूत यांची सामाजिक बांधिलकी अतिशय कौतुकास्पद असून



त्यांना शासनस्तरावरून पुरेसे सहकार्य देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

रस्ता सुरक्षा सप्ताह २०२५ अंतर्गत रायगड जिल्हा पोलीस यांच्यावतीने जीवनदूत सन्मान सोहळा २०२५ चे आयोजन आर. सी. एफ. सभागृह कुरुळ येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर आ. महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवनसंरक्षक राहुल पाटील, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते आदी पस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना मंत्री गोगावले म्हणाले, रायगड जिल्हा हा भौगोलिक दृष्ट्या विविधता असलेला आहे. येथे विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीला सामारे जावे लागते. यावेळी जिल्हा प्रशासन आणि पोलीस यांच्या मदतीला विविध सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक तात्काळ उपलब्ध असतात. अनेकदा जीवाची पर्वा न करता हे जीवनदूत सामाजिक बांधिलकी म्हणून हे काम करीत असतात. रायगड जिल्ह्यातील मागील आपत्ती काळात त्यांनी केलेले कार्य अतिशय उल्लेखनीय आहे. त्यांच्या या सेवेसाठी त्यांचे अभिनंदन. तसेच या जीवनदूत यांना शासनामार्फत सहकार्य देण्यासाठी शासन स्तरावर देखील पाठपुरावा करून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल असेही मंत्री गोगावले यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी अपघात ग्रस्ताना मदत देणाऱ्या स्वयंसेवक किंवा नागरिकांना शासनाने सहकार्य देण्याची भूमिका स्विकारली आहे.